राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेत संधी उपलब्ध करण्याकरीता केंद्रीय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकीग सेवा इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेशाकरीता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी आणि इयत्ता १० वी १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमदेवारांकरीता "मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" कार्यान्वित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र. मोशियो-२०१७/प्र.क्र.२४ (भाग-१)/का-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१८

<u>वाचा:-</u> शासन निर्णय क्रमांक: राअआ-२०१२/१०८/प्र.क्र.१८/का-९, दिनांक २५ जून, २०१३.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत संधी उपलब्ध करण्याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी संवर्ग)/बँकींग सेवा भरती इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी आणि इयत्ता १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्याकरीता दि. २५ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये "मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र.VII मध्ये उक्त योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

शासन शुध्दीपत्रक :-

"मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" या योजनेची अंमलबजावणीकरीता राज्य शासनाच्या क्षेत्रीय यंत्रणेमार्फत अथवा शासनाकडून वर्तमानपत्राद्वारे जाहिरात देऊन एजन्सीची निवड करण्याची कार्यवाही करण्याऐवजी उक्त योजनेअंतर्गत राज्यातील नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, मुंबई व ठाणे या केंद्रात उपरोक्त अभ्यासक्रमाअंतर्गत निवडण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थामार्फत वर्तमानपत्राद्वारे जाहीरात देऊन प्राप्त झालेल्या अर्जांमधून वेगवेगळया प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उमदेवारांकरीता विहीत करण्यात आलेल्या पात्रतेच्या निकषाची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांची निवड करण्यात येईल.

२. दिनांक २५.०६.२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.VIII मध्ये उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी नमूद केलेल्या जबाबदाऱ्यांपैकी क्रमांक ४ ची जबाबदारी वगळता इतर जबाबदाऱ्या निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत पार पाडण्यात येतील. त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या या अथवा इतर योजनेअंतर्गत प्रवेश न देण्याची संस्थेने खबरदारी घेणे आवश्यक राहील. तसेच संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यास अन्य संस्थेने याच योजनेखाली प्रवेश दिलेला नाही याची देखील संबंधीत संस्थांनी खात्री करून घेणे अपेक्षित राहील.

३. उक्त योजनेअंतर्गत उमेदवारांची निवड करण्याच्या प्रक्रीयेच्या खर्चाकरीता प्रशिक्षण संस्थेस शासनामार्फत कोणताही स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३०७१२५२३२६५१४ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.07 12:54:47 +05'30'

(दि.मा.सोनवणे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,
६. अल्पसंख्याक कल्याण समिती, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई.
७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८. महालेखापाल , १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. महासंचालक, यशदा, पुणे
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, (प्रसिध्दीसाठी)
१२. सर्व जिल्हाधिकारी,
१३. संचालक, तंत्रशिक्षण / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण / वैद्यकीय शिक्षण / उच्च शिक्षण / शालेय शिक्षण, संचालनालय. मुंबई / पुणे
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१७. सर्व मा. मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१८. सर्व मंत्रालयीन विभाग,
१९. विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने,
२०. निवडनस्ती (कार्यासन-९).